सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी विरेंद्र हिंगमिरे

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

येथील भीम प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी विरेंद्र हिंगमिरे यांची सलग दहाव्यांदा एकमताने निवड करण्यात आली. संस्थापक दलितमित्र सूर्यकांत बाबरे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत निवडण्यात आलेले इतर पदाधिकारी असे; सचिव-अकबर शेख, उपाध्यक्ष-विशाल मस्के, सल्लागार-स्वाती मस्के, सल्लागार-अमित बाबरे, कार्याध्यक्ष-सिध्दांत बाबरे. कार्यकारिणी-भीम राव माने, वैभव लोखंडे, शशांक माने, नीरज भालेराव, किरण गायकवाड, मारुती खानापुरे, सिध्दांत गायकवाड, संतोष कदम.





### मीना बाजार रोडवरील वाहतूक मार्गात बदल

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

रमजान ईदच्या अनुषंगाने विजापूर वेससह परिसरात भरविण्यात येणाऱ्या मीना बाजारच्या पार्श्वभुमीवर १४ ते २१ मार्च या कालावधीत या भागातील वाहतूक मार्गात बदल करण्यात येत आले. रुग्णवाहिका, अग्निशमन व पोलिस दलाच्या वाहनांना सूट देण्यात आली आहे, असे पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी कळविले आहे. बेगम पेठ पोलिस चौकी ते विजापूर वेस-बाराईमाम चौक ते विजापूर वेस-बाकळे प्रेस ते विजापूर वेस-लक्ष्मी मार्केट ते विजापूर वेस-पंचकट्टा ते विजापूर वेस-लक्ष्मी मार्केट ते विजापूर वेस-लक्ष्मी मार्केट ते विजापूर वेस-माणिक चौक ते विजापूर वेस हा मार्ग बंद करण्यात आला आहे. माणिक चौक-समाचार चौक, भावसार पथ, बाराईमाम चौक, किडवाई चौक मार्गे इच्छित स्थळी-बेगमपेठ पोलिस चौकी, पंचकट्टा, लक्ष्मी मार्केट, दत्त चौक मार्गाचा वापर करावा.

### १६ मार्च रोजी पीएम नॅशनल अप्रेंटिसशिप मेळावा

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

महाराष्ट्र राज्याच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांसाठी सोम वार, दि. १६ मार्च २०२६ रोजी पीएम नॅशनल अप्रेंटिसशिप मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विजापूर रोडवरील बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे सोमवारी सकाळी १० वाजता या मेळाव्यास प्रारंभ होणार आहे. आयटीआय, बारावी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधरांनी यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक सल्लागार एम.एम. बिडकर यांनी केले.

### घरासमोर लावलेल्या दुचाकीला लावली आग

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

रात्री दिलेल्या तक्रारीचा राग मनात धरून दि. ११ मार्च रोजी गोपीनाथ अंबादास खांडेकर (रा.१७४, मुरारजी पेठ, सोलापूर) यांचा लहान भाऊ आदिनाथ अंबादास खांडेकर यांनी घरा समोर लावलेली मोटरसायकल क्रमांक एम.एच.१३ बी.वाय.७३३४ या दुचाकीला आग लावून २५ हजार रुपयांचे नुकसान केले व घरासमोरील टपरीला आग लावून त्यातील आईचे सामान जाळून ५ हजार रुपयाचे नुकसान केले, असे फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दि. ११ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास जाधव करत आहेत.

### राहत्या घरातून ४० हजार रुपये, मोबाईल गेला चोरीला

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

राहत्या घराच्या उघड्या दारातून कोणीतरी अज्ञात चोरट्याने दि. १० मार्च रोजी यश मोहन वाघमारे (रा. १०३७७/२५ मुस्लिम पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या घरात प्रवेश करून ४० हजार रुपयांच्या भारतीय चलनी नोटा व एक विवो कंपनीचा पिवळ्या रंगाचा मोबाईल चोरून नेला आहे. याबाबत जेलरोड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात दि. ११ मार्च रोजी गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास नदाफ हे करत आहेत.

# सोलापुरात ११ पैकी १० जागांवर 'भाजपा'चे सभापती

**▶ माळशिरसमध्ये शिवसेना शिंदे गटाचा सभापती ▶ सांगोल्यात ऐनवेळी 'भाजपा'ने मारली बाजी ▶ पालकमंत्री जयाभाऊंनी मानले जनतेचे आभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापतींच्या निवडी आज जाहीर करण्यात आल्या. यामध्ये जिल्ह्यातील ११ पंचायत समित्यांपैकी १० पंचायतीमध्ये भारतीय जनता पार्टीचे सभापती आणि माळशिरसमध्ये शिवसेना शिंदे गटाच्या सभापतींची निवड झाली आहे. भाजपाला मिळालेल्या या अभूतपूर्व यशाबद्दल जिल्ह्यातील सर्व मतदार, कार्यकर्ते पदाधिकारी, नेते मंडळींचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आभार मानले.

जिल्ह्यातील पंचायत समिती सभापतींच्या निवडी आज जाहीर होत झाल्या असून, याम ध्ये भाजपने जिल्ह्यात मोठं यश मिळवलं आहे. पालकमंत्री जयकुमार गोरेंच्या नेतृत्वात भाजपने जिल्ह्यातील ११ पैकी १० पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवला. आज झालेल्या सभापती निवडीत माळशिरस वगळता इतर सर्व पंचायत समितीवर भाजपचा सभापती बसला आहे. काल सांगोल्यात माजी आमदार दीपक साळुंखे यांच्या तीन सदस्यांनी ऐनवेळी भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर येथील ५५ वर्षांची शेतकरी कामगार पक्षाची सत्ता उलथवून येथे भाजप शिवसेनेची सत्ता आली आहे. सांगोल्यात शहाजीबापू पाटील, दीपक साळुंखे आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. सांगोला पंचायत समिती सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले तर उपसभापतीपदी शिवसेना शिंदे गटाचे अजय सरगर यांची निवड



झाली आहे. पंढरपूर पंचायत समितीमध्येही सत्ताधारी आणि विरोधक यांच्याकडे समसम ान मते होती. मात्र, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सदस्य प्रमोद हरी देशमुख यांनी व्हीप झुगारून भाजपला साथ दिल्याने ९ विरुद्ध ७ मतांनी भाजपचे डॉक्टर शुभम आगलावे हे सभापतीपदी विजयी झाले. राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या प्रमोद देशमुख यांना उपसभापती पद मिळाले आहे.

मोहिते-पाटलांचा बालेकिल्ला समजला जाणाऱ्या माळशिरसमध्ये भाजपच्या विरोधात महाविकास आघाडी आणि महायुतीतील शिंदेसेना व अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एकत्रित येऊन सत्ता आणली होती. याठिकाणी शिंदेंच्या शिवसेनेचे दत्ता मगर यांची सभापतीपदी तर राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मनीषा पाटील यांची उपसभापती पदावर निवड झाली आहे. माळशिरस वगळता सर्व दहा पंचायत समितीवर भाजपने आपला सभापती बसविला असून सात ठिकाणी भाजपचाच उपसभापती तर दोन ठिकाणी राष्ट्रवादी अजित पवार गट आणि एक ठिकाणी शिंदे सेनेचा उपसभापती झाला आहे. या निवडीनंतर जिल्ह्यात सर्वत्र भाजपने मोठ्या प्रमाणात जल्लोष केला आहे. दरम्यान, महाआघाडीचा प्रयोग फसलेल्या बार्शीतही भाजपच्याच सभापती आणि उपसभापतीची वर्णी लागली आहे. भाजपने मिनाक्षी रोंगे सभापती आणि संतोष निंबाळकर उपसभापती बनले आहेत. येथे दोन शिवसेना, दोन राष्ट्रवादी एकत्र येत महाआघाडीचा प्रयोग झाला होता. मात्र, भाजपने निर्विवाद वर्चस्व स्थापन केलं. उत्तर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातही भाजपचाच सभापती झाला असून, यावेळी आमदार सुभाष देशमुख आणि आ.सचिन कल्याणशेट्टी गटाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आनंद व्यक्त केला. यावेळी मनिष देशमुख, चिवडशेट्टी यांना तर कार्यकर्त्यांनी खांद्यावर घेवून नाचविले.

### भाजपाने जिंकला 'शेकाप'चा गड

शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा दिवंगत आमदार स्व.गणपतराव देशमुख यांनी सांगोल्याचा गड आजवर अभेद्य ठेवला होता. मात्र, यावेळेला शेकापसोबत निवडणूक लढलेल्या माजी आमदार दीपक साळुंखे-पाटील गटाच्या तीन पंचायत समिती सदस्यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केल्याने सांगोल्यात सत्तांतर झाले.

**सोलापूर जिल्हा : सभापती / उपसभापती निवडणूक अहवाल २०२६-२७**

| पंचायत समिती | सभापती निवडणूक | | उपसभापती निवडणूक | |
|---|---|---|---|---|
| | **सभापती** | **पक्ष** | **उपसभापती** | **पक्ष** |
| अक्कलकोट | रश्मि हिप्परगी | भाजप | सागर कल्याणशेट्टी | भाजप |
| दक्षिण सोलापूर | संदिप टेळे | भाजप | वर्षा पटणे | भाजप |
| उत्तर सोलापूर | तेजस्विनी बोराडे | भाजप | सुनिल भोसले | भाजप |
| मोहोळ | असलम चौधरी | भाजप | उलका पाटील | भाजप |
| बार्शी | मिनाक्षी रोंगे | भाजप | संतोष निंबाळकर | भाजप |
| करमाळा | पुजा ढेरे | भाजप | अजिनाथ विघ्ने | रा.का. पा.(अ.प.) |
| माढा | पंडित देशमुख | भाजप | स्वाती गिड्डे | भाजप पुरस्कृत अपक्ष |
| मंगळवेढा | दिपाली ताड | भाजप | अर्जुन मल्लाळे | भाजप |
| सांगोला | पुनम इंगवले | भाजप | अजय सरगर | शिवसेना (शिंदे सेना) |
| पंढरपुर | शुभम आगावणे | भाजप | प्रमोद देशमुख | रा.का. पा.(अ.प.) |
| माळिशरस | दत्तात्रय मगर | शिवसेना (शिंदे) | मनिषा पाटील | रा.का. पा.(अ.प.) |

## आज प्रधानमंत्री किसान सन्मान निधीचा मिळणार बळीराजाला हप्ता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी. एम. किसान) योजनेंतर्गत डिसेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीतील २२ वा हप्ता प्रधानमंत्री यांच्या हस्ते दि. १३ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५.00 वाजता ज्योती-बिष्णु आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक केंद्र, खानापारा, गुवाहाटी (आसाम) येथे वितरित करण्यात येणार आहे.



केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार मिळावा यासाठी ही योजना फेब्रुवारी २०१९ पासून सुरू केली आहे. योजनेनुसार पात्र शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्षी रु. ६,000 इतकी आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये (प्रति हप्ता रु. २,000) त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते. आतापर्यंत राज्यातील पात्र शेतकरी कुटुंबांना २१ हप्त्यांद्वारे सुमारे रु. ३९,३00 कोटींचा लाभ वितरित झाला आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी भूमी अभिलेख नोंदणी अद्ययावत करणे, बँक खाते आधारशी संलग्न करणे तसेच ई-केवायसी प्रमाणीकरण करणे बंधनकारक आहे. सद्यस्थितीत या तिन्ही बाबींची पूर्तता केलेल्या सुमारे ९१.१९ लाख शेतकरी कुटुंबांना दिनांक १३ मार्च रोजी सुमारे रु. १,८३७ कोटी इतकी रक्कम थेट हस्तांतरणाद्वारे जमा होणार आहे.

सदर कार्यक्रमाचे आयोजन राज्यातील कृषी विज्ञान केंद्र, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर तसेच कृषी उत्पन्न बाजार समिती, शासकीय कार्यालये, संशोधन केंद्रे, शेतकरी उत्पादक कंपनी (FPCs), शेतकरी उत्पादक संघटना (FPOs) आणि सहकारी पतसंस्था (PCS) येथे करण्यात येणार आहे. नागरी सुविधा केंद्रांवरूनही या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पाहता येणार आहे. राज्यातील कृषी विभाग, महसूल व वने विभाग तसेच ग्राम विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा समारोह साजरा होणार असून, कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://pmindiawebcast.nic.in या संकेतस्थळावरून करण्यात येईल. राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पुणे येथील कृषी आयुक्तालयाचे कृषी संचालक (विस्तार व प्रशिक्षण) रफिक नाईकवाडी यांनी केले आहे.

### बँक ऑफ इंडियातर्फे मेगा समझौता अभियान

**सोलापूर, दि. १२ मार्च-**

बँक ऑफ इंडियाने १६ ते २० मार्च या कालावधीत 'मेगा समझौता अभियान'चे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत देशभरातील सर्व शाखा/ झोन आणि एफजीएमओ येथे एकरकमी निपटारा (ओटीएस) योजनेअंतर्गत कर्जदारांच्या एनपीए कर्ज खात्यांचे निपटारा करण्यात येणार आहे. व्यवसायातील अडचणी, आरोग्याशी संबंधित समस्या किंवा इतर कोणत्याही वास्तविक कारणांमुळे वेळेवर कर्ज फेडू शकले नाहीत. अशांसाठी या अभियानचे आयोजन करण्यात आले आहे. बँकेत लहान व मध्यम आकाराच्या खात्यांच्या निपटाऱ्यासाठी विशेष ओटीएस योजना उपलब्ध आहेत. या योजनांद्वारे खातेधारक कर्जदारांना विशेष आणि आकर्षक सवलती देण्यात येतात. 'मेगा समझौता अभियान'चा लाभ घेऊन आपल्या एनपीए कर्ज खात्यांचा निपटारा करावा, असे आवाहन बँकेने केले आहे.

## वारकऱ्यांचे फेस रिकग्निशन; आमदार कायंदेंनी केले कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१२ मार्च-**

पंढरपूर येथे आषाढी वारीच्या कालावधीत लाखो वारकऱ्यांची गर्दी होते. या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांची सुरक्षा, हरवलेले व्यक्ती शोधणे, गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने सोलापूर ग्रामीण पोलिस दलाकडून फेस रिकग्निशन आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला होता.





या उपक्रमाबद्दल आमदार डॉ.मनीषा कायंदे यांनी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून वारीदरम्यान अत्याधुनिक फेस रिकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करुन सुमारे २० लाख वारकऱ्यांचे फेस रिकग्निशन करण्यात आले. या उपक्रमामुळे वारकरी सुरक्षेला मोठी मदत झाली. हरवलेले व्यक्ती शोधणे, संशयित व्यक्तींची ओळख पटविणे, कायदा व सुव्यवस्था राखणे यामध्ये पोलिसांना मोठ्या प्रमाणात सहाय्य मिळाले. हा उपक्रम राज्यातील मोठ्या धार्मिक ठिकाणी प्रथम वापरण्यात आलेला एक नाविन्यपूर्ण प्रयोग ठरला असून त्याची दखल राज्यस्तरावर देखील घेण्यात आली आहे. या कामगिरीची चर्चा महाराष्ट्र विधानपरिषदेमध्ये झाली. आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी या उपक्रमाकडे लक्ष वेधत कौतुक केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्यासह अपर पोलिस अधीक्षक, प्रितम यावलकर, सर्व उपविभागीय अधिकारी, पोलिस निरीक्षक संजय जगताप आणि अन्य पोलिस अधिकारी, कर्मचारी, तांत्रिक पथक परिश्रम घेतले होते.

**ही आहे आकडेवारी**

सन २०२५ मध्ये एकूण २७ ते २८ लाख भाविक पंढरपूर येथे दर्शनाकरिता आले होते. त्यादिवशी २८६१ लोक हरवले होते. फेस रिकग्निशन तंत्रज्ञानाचा वापर करुन २८५२ जणांना त्यांच्या नातेवाईकांपर्यंत सुरक्षितरित्या पोहचविण्यात आले.

**पोलिसिंग सक्षम करु**

नागरिकांची सुरक्षा अधिक मजबूत होते. भविष्यात देखील अशा उपक्रमांद्वारे पोलिसिंग अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न सोलापूर ग्रामीण पोलीस दलाकडून केला जाणार आहे, असे पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी याबाबत बोलताना सांगितले.






# पोलिस बंदोबस्तात गॅस सिलेंडरचे वितरण सुरु

**पंपांवर रिक्षांच्या रांगाच रांगा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

आखाती देशात सुरु असलेल युध्दाचा परिणाम भारतातील गॅस, पेट्रोल, डिझेल वितरणावर होत आहे. गॅस सिलेंडरचे वितरण बंद होणार या धास्तीने लोक आपापल्या वितरकांकडे गॅस सिलेंडर घेण्याकामी गर्दी करीत आहेत. त्यामुळे पोलिस बंदोबस्तात गॅस सिलेंडरचे वितरण करण्यात येत आहे. पंपांवर गॅस भरुन घेण्यासाठी रिक्षांच्या रांगाच रांगा लागत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, गॅसचा अतिरिक्त साठवणूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असे प्रभारी जिल्हाधिकारी कुलदीप जंगम यांनी स्पष्ट केले. जिल्हा प्रशासनाची बीपीसीएल, एचपीसीएल व आयओसीएल या इंधन व गॅस पुरवठा करणाऱ्या कंपनीशी चर्चा झालेली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडरचा कुठेही तुटवडा भासणार नाही. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिकांनी पेट्रोल,



डिझेल व गॅस सिलेंडरची अतिरिक्त साठवणूक करू नये. गॅस पुरवठा कंपन्या व त्यांच्या एजन्सी यांच्याशी जिल्हा प्रशासन सातत्याने संपर्कात असून मागणीप्रमाणे गॅस पुरवठा होणार आहे. कोणत्याही अफवावर विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी सांगितले.

गॅस एजन्सीमार्फत व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या सर्व गॅस सिलेंडरचे बुकींग पुर्णतः बंद केलेले आहे. शासकीय संस्था, रुग्णालय, एनटीपीसी, अन्नछत्र मंडळ यांना वरील नियमामधून सूट देण्यात आलेली आहे. व्यावसायिक तत्त्वावर पुरविण्यात येणाऱ्या गॅस सिलेंडर बाबत उच्चस्तरीय चर्चा करणेत येत असून, सर्व बाबींचा विचार करून यावर निर्णय घेणेत येईल. घरगुती गॅस सिलेंडर बुक केलेनंतरचा प्रतिक्षा कालावधी २५ दिवसांचा करणेत आलेला आहे, असे गॅस कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले.

**तालुकास्तरीय दक्षता पथक**

जिल्हा पुरवठा कार्यालयामार्फत गॅस सिलेंडर वितरण नियंत्रित करणे, काळाबाजार रोखणे याकरिता तालुकास्तरीय दक्षता पथक गठीत करणेत आलेले आहे. सदर दक्षता पथकांना गॅस एजन्सीच्या तपासण्या करून दैनंदिन गॅस सिलेंडर आवक जावक वर नियंत्रण ठेवणेबाबत निर्देशित करणेत आलेले आहे, असे सांगण्यात आले.

### ११.८८ लाख घरगुती, १० हजार व्यावसायिक ग्राहक

सोलापूर जिल्ह्यात माहे फेब्रुवारी २०२६ अखेर ११ लाख ८८ हजार २५८ घरगुती तर १० हजार ८00 व्यावसायिक गॅस ग्राहक आहेत. सोलापूर जिल्ह्याकरिता घरगुती गॅसची दैनंदिन गरज २५0 मे.टन तर व्यावसायिक गॅसची १0 मे.टन इतकी आहे, अशी माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे व अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांनी दिली आहे.

### जिल्ह्यात एकूण ९४ गॅस एजन्सीज्

सोलापूर जिल्ह्यात एकूण ९४ गॅस एजन्सी कार्यरत आहेत. यामध्ये बीपीसीएल ५४, एचपीसीएल २० व आयओसीएल २० अशा गॅस एजन्सी आहेत. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जिल्ह्यातील गॅस कंपनीचे समन्वय अधिकारी यांची तातडीची बैठक घेऊन गॅस सिलेंडर वाटप नियोजनाचा आढावा घेतलेला आहे. गॅस सिलेंडर वितरण नियमांमध्ये बदल करण्यात आले आहेत.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३८१

**शुध्द बुध्दी दोघां होय एक मान।**
**चोरासवें कोण जिवें राखें ।।**

लोकांनी आपणाला चांगले म्हणावे असे प्रत्येकाला वाटते. खरे म्हणजे केवळ असे वाटून चालत नाही, तर त्यासाठी प्रत्यक्ष चांगली वृत्तीच असावी लागते. चांगले वागणाऱ्याला मला चांगले म्हणा असे म्हणण्याची वेळही येत नाही. कारण चांगुलपणा पाहून लोक आपोआप चांगले म्हणू लागतात. चांगुलपणा निर्माण करण्यासाठी मनोवृत्तीची जोड तर हवीच पण चांगल्यांचा सहवासही लाभला पाहिजे. इच्छा नसतांनाही किंवा योगायोगाने जरी एखादा व्यक्ती चांगल्याच्या सहवासात राहू लागला तर लोक त्यालाही चांगले म्हणू लागतात. त्यातल्या त्यात दोघेही चांगले असतील तर एकमेकांचा हा सहवास दोघांचाही मान वाढविण्यास कारणीभूत ठरतो.



पण कळत नकळत चांगला व्यक्ती वाईटाच्या सहवासात गेला तर त्या वाईटाबरोबर चांगल्यालाही लोक वाईट म्हणून लागतात. वाईटाची, वाईटपणाची प्रबलता चांगल्याचा चांगुलपणा हरण करू शकते. अर्थात, चांगल्याला वाईट बनवू शकते. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, शुध्द बुध्दी दोघां होय एक मान। चोरासवें कोण जिवें राखें ।।

वाईटातील प्रत्येकजण मुळातच वाईट असतो असे नाही. परिस्थितीनुरुप कांही लोक चुकीच्या मार्गावर गेलेले असतात. अशा लोकांना आपण योग्य ती दिशा देण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच ते चांगल्या मार्गावर येऊ शकतात. आपण वाईटाच्या सहवासात जावून त्याच्या प्रभावाने वाईट होण्यापेक्षा आपल्या चांगुलपणाच्या प्रभावाने त्याला चांगले बनविणे अत्यंत आवश्यक व महत्वाचे असते. वाईट हे प्रभावी व लवकर आपली पकड घट्ट करणारे असले तरीही चांगले ते चांगलेच असते. वाईटांपासून नेहमी दूर रहावे असे जरी महात्मे सांगत असले तरी त्या व्यक्तीपासून दूर रहा, असे मात्र ते म्हणत नाहीत. उलट अशा व्यक्तीतील वाईटपणा काढून टाकण्याचा प्रयत्न करा, जेणेकरून तोही आपल्यासारखा चांगला होईल, असे संत म्हणतात. संतांचा हा सकारात्मक विचाराचा दृष्टीकोन खऱ्या अर्थाने मानवता निर्मितीचा आधारस्तंभ आहे. मानवतेचा हा पाया मजबूत करण्याची आपणा सर्वांची जबाबदारी आहे. वाईटाने एकदम चांगले बनावे अशी अपेक्षा न ठेवता हळू हळू त्याच्यात परिवर्तन करणे जास्त योग्य असते. आपली मानसिकता दृढ असेल तर वाईटातल्या वाईटावर विजय मिळविणे सोपे असते, हे आपण लक्षात ठेवावे. इतरांना वाईटापासून परावृत्त करण्यासाठी प्रथम आपण आपल्यातील दुर्गूण टाकले पाहिजेत. आपण चांगले तरच जग चांगले, हे ही याप्रसंगी लक्षात असू द्यावे. ज्ञानोबा-तुकोबांच्या विचाराचा सहवास आपल्या वर्तनातून इतरांना देण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एक प्रकारे संतांचे कार्य चालू ठेवणे होय.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## ‘पॅट’साठी हजर विद्यार्थीच मानला जाणार शाळेचा पट

### संकलित मूल्यमापन चाचणीचे वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मार्च-**

इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची संकलित मूल्यमापन चाचणी (पॅट-२) येत्या ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) यांनी या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ११ एप्रिलला पहिली भाषा, १५ एप्रिलला गणित आणि



२२ एप्रिलला इंग्रजी (तिसरी भाषा) या विषयांचे पेपर होणार आहेत. या तिन्ही विषयांच्या प्रश्नपत्रिका एससीईआरटी कडूनच उपलब्ध करून दिल्या जाणार असून त्या ठरविलेल्या तारखेलाच घेणे शाळांसाठी बंधनकारक आहे. इतर विषयांच्या परीक्षा मात्र शाळांना ११ ते २२ एप्रिल या कालावधीत घेता येणार आहेत. दरम्यान, ‘पॅट’ परीक्षेला जितके विद्यार्थी उपस्थित राहतील, तीच त्या शाळेची पटसंख्या गृहीत धरली जाणार असल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षेला उपस्थित राहावे.

**अचानक तपासण्या होणार**

‘पॅट-२’ परीक्षा सुरू असताना शिक्षणाधिकाऱ्यांसह अन्य अधिकारी शाळांना अचानक भेटी देणार आहेत. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता राखली जाते की नाही, याची पडताळणी केली जाणार आहे. परीक्षा झाल्यानंतर सर्व प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिका शाळांनी जतन करून ठेवणे बंधनकारक आहे.

**पाचवी व आठवीसाठी ढकलपास बंद**

इयत्ता पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी ढकलपास पद्धत बंद करण्यात आली आहे. या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना जून महिन्यात पुनर्परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यापूर्वी संबंधित विषय शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अतिरिक्त मूल्यमापन करणे अपेक्षित आहे. उत्तरपत्रिका जतन करून ठेवणेही आवश्यक असून शिक्षणाधिकारी कधीही त्यांची तपासणी करू शकतात. ‘पॅट’ चाचणीद्वारे विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीची पडताळणी, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सुधारणा तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

## उन्हाळ्याच्या खबरदारीसाठी महापालिका राबविणार ‘बिट टू हिट’ उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ मार्च -**

शहरातील वाढते तापमान लक्षात घेऊन सोलापूर महापालिका आरोग्य विभागाच्यावतीने ‘‘बिट टू हिट’’ उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत उष्णतेशी संबंधित आजारांबाबत उपाययोजना करण्याबरोबरच जनजागृती व समुपदेशन करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी सर्व आरोग्य सेवा केंद्रांमध्ये (महानगरपालिका दवाखाने) उष्णतेशी संबंधित आजारांबाबत जनजागृती, समुपदेशन व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. या उन्हाळ्यात आरोग्य केंद्रांमध्ये ओआरएस, सावलीची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येत आहे. कडक उन्हाच्या त्रासापासून बचावासाठी ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, गर्भवती महिला, दीर्घकालीन आजार असलेले रुग्ण यांनी शक्यतो कामानिमित्त सकाळी बाहेर पडावे, नागरिकांनी पक्षी व प्राण्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करावी.

**उन्हाचा त्रास झाल्यास मनपाच्या दवाखान्यात सल्ला घ्या**

उच्च रक्तदाब व मधुमेह असलेल्या नागरिकांनी स्वतः ची विशेष दक्षता घ्यावी. उष्माघाताची लक्षणे (चक्कर येणे, डोकेदुखी, उलटी, अशक्तपणा) दुर्लक्ष करू नका व आजारी वाटत असताना स्वतः औषधे घेणे टाळा व त्वरित जवळच्या, महानगरपालिका दवाखाने भेट देऊन वैद्यकीय सल्ला घ्या, असे आवाहन डॉ. माने यांनी केले आहे.

## सामूहिक प्रयत्नांतून होम मैदान झाले स्वच्छ

### सेवा विभाग, पर्यावरण गतिविधीचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

सेवा विभाग पर्यावरण गतिविधीच्या पुढाकाराने सोलापूरकरांच्या सामूहिक प्रयत्नांतून झालेल्या स्वच्छता मोहिमेतून होम मैदान स्वच्छ झाले. सुमारे ३०० सोलापूरकरांनी एकत्र येऊन ही स्वच्छता मोहीम राबवली. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी स्वतः हाती खराटा घेत मैदानाच्या स्वच्छता मोहीमेत सहभाग घेतला.

सेवा विभाग, पर्यावरण गतिविधी, संत निरंकारी मंडळ, एसव्हीसीएस शाळा, आर्किटेक्चर कॉलेजमधील कार्यकर्ते, विद्यार्थी तसेच महापालिकेचे कर्मचारी बुधवारी सकाळी स्वच्छतेचा निश्चय करून होम मैदान येथे जमले.

प्रारंभी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, संत निरंकारी मंडळाचे प्रमुख इंद्रपालसिंग नागपाल, नगरसेवक विनोद भोसले, नागेश खरात, नगरसेविका श्रीदेवी फुलारे, महापालिकेचे मुख्य



सफाई अधिक्षक नागनाथ बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

होम मैदानावर वर्षभर विविध उपक्रम होतात. त्याकरिता सोलापूर महानगरपालिकेकडून होम मैदान आयोजकांना भाड्याने देण्यात येते. मैदानाची योग्य निगा न राखल्यामुळे होम मैदानावर चालणाऱ्या विविध उपक्रमामुळे मैदानाची दुरवस्था होत आहे. परिणामी मैदान अत्यंत अस्वच्छ झाले होते. मैदानावर सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य निर्माण झाले होते. यावर उपाय म्हणून सेवा विभाग, पर्यावरण गतिविधी यांनी पुढाकार घेत शहरातील विविध संस्था संघटना मंडळांना सहभागी करून घेत सोलापूर महानगरपालिकेच्या सहभागातून होम मैदानाची स्वच्छता केली.

यावेळी विविध संस्था मंडळांच्या कार्यकर्त्यांनी हातात खराटा, टोपली, पोती घेऊन होम मैदानवरील सुमारे पावणेदोन टन कचरा उचलला. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे ८३ कर्मचारी, ७ घंटा गाड्या, जेसीबी, पाण्याची गाडी आदी व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे सफाई अधीक्षक अनिल चराटे, मुख्य आरोग्य निरीक्षक सोमाजी साबळे आदी उपस्थित होते.

या स्वच्छता मोहिमेत पर्यावरण संरक्षण गतिविधि, सोलापूर महानगरपालिका, यश डेव्हलपर्स, इको नेचर क्लब, एस व्ही सी एस स्कूल, संत निरंकारी मंडळ, सेवा विभाग, सोलापूर आर्किटेक्चर असोसिएशन या संस्था मंडळांनी सहभाग घेतला.

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : शुक्रवार,
दि. १३ मार्च २०२६
विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - फाल्गुन कृ. नवमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- मूळ (२४.४२)
योग - सिध्दी (०९.५७)
करण - तैतिल (१७.२६)
राहू काल : शुक्रवार : दु. १.३० ते ३.००

दिनविशेष : २००७: वेस्ट इंडीजमधे ९ व्या क्रिकेट विश्वकरंडक क्रिकेटस्पर्धेचे उदघाटन झाले. २००३: मुंबई शहरातील लोकल रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले. १९९९: कोयना जलविद्युत प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याचे उद्घाटन झाले. १९९७: मदर तेरेसा यांच्या वारस म्हणून सिस्टर निर्मला यांची निवड करण्यात आली.

## मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १२ मार्च-** होणाऱ्या त्रासाला कंटाळून एका व्यक्तीने तिसऱ्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. याबाबत मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी दोघां विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. या हकीकत अशी की, दि. ७ मार्च रोजी देवराज संतोष सुरवसे (रा. ३२/१ नर्सिंग नगर, जुळे सोलापूर यांचे वडील संतोष सुरवसे यांना सतीश रामचंद्र गलांडे रा. तोडकर वस्ती, प्रभा ज्ञानेश्वर कदम रा. जुळे सोलापूर यांच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून त्यांनी बाळे येथील प्लॉट नंबर १०६ / १०७ चे अर्धवट बांधकाम असलेल्या तिसरे मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केली. त्यामुळे यातील सतीश गलांडे व प्रभा कदम हे त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याने त्यांच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सुतार करत आहेत.



## स्वराज्य कर्तृत्ववान महिला पुरस्काराने २४ महिलांना सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १२ मार्च-**

स्वराज्य पोलिस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना सोलापूर जिल्ह्याच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्या २४ महिलांना स्वराज्य कर्तृत्ववान महिला पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

सोलापूरच्या चौडेश्वरी मंगलकार्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वराज्यच्या प्रदेशाध्यक्षा धनश्रीताई उत्पात ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वराज्यचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक कांबळे, विश्वस्त उमेश काशीकर, उद्योपती निता रघोजी, पत्रकार श्रुती गांधी ह्या होत्या. स्वराज्य चे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत वेदपाठक यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक कमलेश शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**सत्कारमूर्ती महिला**

धनश्रीताई उत्पात, अंबुबाई वेदपाठक, शुभांगी पंडित, श्रुती गांधी, निता रघोजी, जयश्री शहाणे, दीप्ती शहाणे, राजश्री टाक, हेमावती उपळाईकर, अंजली कुरुलकर, सुनंदा क्षीरसागर, स्मिता पोतदार, वर्षा पोतदार, अर्पिता शिंदे, महानंदा सोनवणे, रामेश्वरी निंबाळे, अश्विनी क्षीरसागर, उर्मिला कदम, पुजा पत्तार, मिराबाई बुद्रुक, अलका विभूते, सविता सागरे, चंद्रकला पोतदार, शांताबाई बंगरगी.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वराज्य चे जिल्हा कार्याध्यक्ष सुनिल पंडित, जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, सचिव सुधाकर शहाणे, सरचिटणीस दिपक कुरुलकर, सरचिटणीस दत्तगुरु वेदपाठक, दिलीप क्षीरसागर, संतोष दीक्षित, अमर शिंदे, रोहित उपळाईकर, अमोल शहाणे, गौरीशंकर सोनवणे, आदींनी विषेश मेहनत घेतली.

## सोलापूरच्या रंग संवाद प्रतिष्ठानच्या बालनाट्यास प्रथम पारितोषिक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**



मीरा शेंडगे



उमेश बटाणे



अन्यना पिंपळकर

महाराष्ट्र राज्य बाविसावे बालनाट्य स्पर्धेत येथील रंग संवाद प्रतिष्ठान या संस्थेने डॉ. मीरा शेंडगे लिखित मीही का शेंडगे दिग्दर्शित हीबा कुशाया बालनाट्याच्या लेखनासाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले.अमरावती येथे नुकत्याच झालेल्या अंतिम फेरीत त्यांनी ही कामगिरी केली. या स्पर्धेत डॉ. मीरा शेंडगे यांना प्रकाश योजनेचे द्वितीय पारितोषिक उमेश बटाने यांना तर उत्कृष्ट स्त्रिअभिनयाचे रौप्य पदक अनन्या पिंपळकर हिला मिळाले.

सोलापूर शहरातील सर्व रंगकर्मी समन्वयक अमोल धाबळे व नाट्य परिषदेचे अध्यक्ष विजय साळुंखे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## महापालिका अंदाजपत्रक : आर्थिक शिस्त अन् नवे उत्पन्न स्रोत निर्मिती काळाची गरज

सोलापूर शहराचा विकास केवळ मोठ्या घोषणा किंवा योजनांवर होत नाही; तो मजबूत आर्थिक पायावर उभा राहतो. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य सेवा, उद्याने आणि नागरिकांसाठीच्या विविध सुविधा या सर्व गोष्टींसाठी महापालिकेची आर्थिक ताकद भक्कम असणे आवश्यक असते. परंतु आज सोलापूर महापालिकेच्या बाबतीत उत्पन्नाचे मर्यादित स्रोत आणि आर्थिक शिस्त महत्त्वाचे आहे. आठ वर्षानंतर स्थायी समितीला चेअरमन लाभला आहे. स्थायी समितीच्या नूतन सभापती रंजीता चाकोते यांनी कामकाजात सुरुवात केली आहे. महापौर विनायक कोंड्याल हे ऑन द स्पॉट व्हिजिट देऊन विविध प्रश्न अडचणी जाणून घेत आहेत. स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर याला अभिप्रेत असलेले अंदाजपत्रक तयार करण्याचा प्रयत्न आहे.

महापालिकेच्या उत्पन्नाचे प्रमुख स्रोत म्हणजे मालमत्ता कर, पाणीपट्टी, व्यापारी परवाने, जाहिरात शुल्क, बाजारपेठेचे भाडे, बांधकाम परवानग्या तसेच राज्य आणि केंद्र सरकारकडून मिळणारी अनुदाने. कागदावर हे स्रोत मोठे वाटतात मात्र प्रत्यक्षात महसूल वसुली अपेक्षित पातळीवर होत नसल्याचे चित्र वारंवार समोर येते. विशेषतः मालमत्ता कर आणि पाणीपट्टीची मोठी थकबाकी ही महापालिकेच्या आर्थिक व्यवस्थेतील गंभीर बाब ठरत आहे. यंत्रणेमधील त्रुटी आणि नियोजनाचा अभाव यामुळे महापालिकेच्या तिजोरीत येणारा महसूल मर्यादित राहतो. परिणामी विकासकामे रखडतात, प्रकल्प अपूर्ण राहतात आणि नागरिकांना मूलभूत सेवांसाठीही अडचणींचा सामना करावा लागतो. दुसरीकडे खर्चाच्या बाबतीतही काटेकोर आर्थिक शिस्त दिसून येत नाही, अशी टीका अनेकदा होत असते.काही वेळा प्रकल्पांची घोषणा मोठ्या गाजावाजात होते, निधीही खर्च होतो परंतु त्याचा दीर्घकालीन फायदा शहराला कितपत होतो, हा प्रश्न कायम राहतो. योग्य नियोजन, प्राधान्यक्रम आणि पारदर्शकता नसल्यास आर्थिक संसाधने वाया जाण्याचा धोका वाढतो.

आज सोलापूरसारख्या वाढत्या शहरासाठी केवळ पारंपरिक उत्पन्न स्रोतांवर अवलंबून राहणे पुरेसे ठरणार नाही. कर वसुली अधिक प्रभावी केली जात आहे. थकबाकीदारांवर कडक कारवाई करणे, डिजिटल प्रणालीद्वारे पारदर्शकता वाढवणे तसेच सार्वजनिक मालमत्तेचा योग्य वापर करून नवीन महसूल स्रोत निर्माण करणे ही काळाची गरज आहे. त्यासाठी हद्दवाढ भागामध्ये नवे गाळे बांधणे, आकर्षण निश्चित करणे त्याचबरोबर रहदारी अडथळा होणार नाही या पद्धतीने फुटपाथ मार्केटची संकल्पना निर्माण करण्याची गरज आहे.






उत्पन्न वाढीसाठी विविध क्षेत्रातील अनुभवी तज्ञ मंडळींची एक समिती गठीत करावी. त्याचबरोबर महापालिकेतील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि काटेकोर आर्थिक शिस्त निर्माण झाली पाहिजे. नागरिकांनी भरलेला कर हा केवळ महसूल नसून तो शहराच्या विकासासाठी दिलेला विश्वास असतो.

सोलापूरच्या उज्ज्वल भविष्यासाठी महापालिकेची आर्थिक घडी मजबूत करणे, उत्पन्नाचे स्रोत वाढवणे आणि आर्थिक शिस्त प्रस्थापित करणे हीच खरी विकासाची गुरुकिल्ली ठरणार आहे. अन्यथा विकासाच्या घोषणा होत राहतील पण नागरिकांच्या अपेक्षा मात्र अपूर्णच राहतील.

## आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने महिलांना गुणगौरव पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ मार्च-**

आस्था सामाजिक संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना गुणगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले.

शिवानुभव मंगल कार्यालयात झालेल्या याचे वितरण महापालिका स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, माजी महापौर शोभाताई बनशेट्टी, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव, लायन्स क्लब ऑफ सोलापूर अध्यक्ष नंदा लाहोटी, गांधी नाथा रंगजी प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका संरोजना मुलींटी, आस्था सामाजिक संस्था अध्यक्ष आनंद तालिकोटी, सचिव शिवानंद सावळगी, अनिल जमगे, योगेश कुंदुर यांच्या उपस्थितीत झाले. महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रमात भेटवस्तू तसेच



**पुरस्कार प्राप्त महिला**

अनिता मोरे (महिला पोलिस अंमलदार), वंदना तळीखेडे (महाराष्ट्र कामगार कल्याण सहाय्यक), सुजाता जुगदार (मुख्याध्यापिका छत्रपती शिवाजी प्रशाला), स्नेहल पेंडसे (योग प्रशिक्षिका), उषा क्षिरसागर (पोस्ट मास्टर), महादेवी धुळे (समाजसेविका), प्रिया माने (आरोग्य सेविका म.न.पा), डॉ अश्विनी करपे (डेंटिस्ट), डॉ.शितल कुलकर्णी (आयुर्वेदाचार्य), अश्विनी देवद्वारे (सहशिक्षिका चतुराबाई श्राविका प्राथमिक शाळा), अर्चना अक्कलकोटे (सहशिक्षिका पी.एस. इंग्लिश मीडियम स्कूल), प्रतिमा स्वामी (सहशिक्षिका वि.मो. मेहता विद्यालय), ऐश्वर्या खडके (उद्योजिका), ज्ञानेश्वरी भोसले (वृत्तपत्र समन्वयक), तेजस्वी रायलिवाला (प्रशिक्षिका मोटर ड्रायव्हिंग स्कूल), अंजली साबळे (एलआयसी एजंट).

गरिब,गरजू १०० महिलांना भेटवस्तू वाटप करण्यात आले. प्रास्ताविक वसुंधरा पवार यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा कंगळे यांनी केले. प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी वेदांत तालिकोटी, पिंटू कस्तुरे, सुरज, उदय छंचुरे, प्रथमेश गावडे, अथर्व शिंदे यांनी परिश्रम घेतले.

**सशक्त व सक्षम भारतीय नारी बनेल**

रंजिता चाकोते म्हणाल्या, महिला आज प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत. ती निरोगी असेल तर समाज, देश एक सशक्त नारी बनेल. ती कुटुंबाची जबाबदारी घेत समाजामध्ये आपली खारीचे योगदान देते. ती स्वतःचे संरक्षण केले पाहिजे तसेच संरक्षणाचे धडे घेऊन सकारात्मक विचाराने मुली व महिला आपली जीवनाची वाटचाल घेतली पाहिजे तरच आजची महिला सशक्त व सक्षम नारी बनेल.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पिलीवच्या शिबिरात ६५० जणांची मोफत तपासणी

### माजी आमदार राम सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १२ मार्च-**

पिलीव (ता. माळशिरस) येथे पंचायत समिती सदस्या नम्रता पुकळे यांच्या संकल्पनेतून माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या शिबीरात ६५० जणांची मोफत तपासणी करण्यात आली.



शिबिराचे उद्घाटन पंचायत समिती सदस्या नम्रता पुकळे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष राहुल मदने, माळशिरस तालुका मंडल अध्यक्ष नितीन मोहीते, जिल्हा पश्चिम विभाग प्रमुख शिवराज पुकळे, पिलीव शहराध्यक्ष प्रमोद भैस, डॉ निलेश कांबळे, विक्रम सुळे, अंकुश भैस, गणेश देशमुख, राहुल भैस, खंडु माने, रामभाऊ गलांडे, राहुल भैस, योगेश देशमुख, सनी घोंगडे, संजय पाटील उपस्थित होते. शिबिरात हृदयविकार, युरोलॉजी, डोळे तपासणी, कॅन्सर तसेच इतर विविध आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. अल्प दरात चष्म्याचे वाटपही करण्यात आले. शिबीरात मिरज येथील सेवासदन हॉस्पीटलच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासणी केली.





# माळशिरसच्या सभापतीपदी दत्तात्रय मगर तर उपसभापतीपदी मनीषा पाटील

### तालुक्यात प्रथमच शिंदे सेनेचा सभापती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.१२ मार्च-**

माळशिरस पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेना शिंदे गटाचे दत्तात्रय मगर तर उपसभापतीपदी राष्ट्रवादीच्या मनीषा पाटील यांची मतदानाद्वारे निवड झाली. माळशिरस पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती निवडीसाठी आज निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रांताधिकारी विजया पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीच्या सभागृहात बैठक बोलविण्यात आली होती.

या निवडीसाठी सचिव म्हणून गटविकास अधिकारी रघुनाथ पांढरे यांनी काम पहिले. सकाळी अकरा वाजता सभापती पदासाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, शिवसेना शिंदे गटाचे दत्तात्रय मगर व भाजपच्या ऋतुजा पराडे-पाटील यांनी तर उपसभापतीसाठी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने मनीषा पाटील तर भाजपच्या वतीने आनंद शेंडगे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यानंतर वैष्णवीदेवी मोहिते-पाटील यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतला. दुपारी दोन वाजता सर्व नवीन सदस्यांची सभापती उपसभापती निवडीसाठी बैठक घेण्यात आली. सभापती पदासाठी दोन व उपसभापती पदासाठी दोन अर्ज आल्याने हात उंच करून मतदान घेण्यात आले. सभापती पदासाठी दत्तात्रय मगर यांना बारा सदस्यांनी पसंती दिली तर ऋतुजा पराडे-पाटील यांना सहा सदस्यांनी पसंती दिली. शिवसेना शिंदे गटाचे दत्तात्रय मगर यांना बारा सदस्यांनी पसंती दिल्याने त्यांची सभापतीपदी निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाहीर केले.

**शिंदेसेनेचा जिल्ह्यातील पहिला सभापती**

सोलापूर जिल्ह्यात पहिल्यांदाच माळशिरस पंचायत समितीच्या सभापतीपदी शिवसेना शिंदे गटाचे दत्तात्रय मगर यांची निवड झाल्याने प्रथमच शिंदे सेनेचा सभापती झाला आहे.

**यांनी केले मतदान**

सभापती दत्तात्रय मगर व उपसभापती मनीषा पाटील यांना वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, विमल जानकर, निशा गिरमे, युवराज झंजे, रेश्मा माने, सोनाली पाटील, ॲड. प्रवीण वाघमोडे, मनीषा नाईकनवरे, आप्पासाहेब पाटील, महादेव साबळे यांनी मतदान केले. तर पराडे पाटील व शेंडगे यांना ऋतुजा पराडे पाटील, आनंद शेंडगे, दत्तात्रय शेळके, तनुजा खिलारे, राजश्री रुपनवर, नम्रता पुकळे यांनी मतदान केले.

उपसभापती पदासाठी दोन अर्ज असल्याने त्यासाठी हात उंच करून मतदान घेण्यात आले. यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या मनीषा पाटील यांना बारा सदस्यांनी पसंती दर्शवली तर भाजपाचे आनंद शेंडगे यांना सहा सदस्यांनी पसंती दर्शवली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी उपसभापतीपदी मनीषा पाटील यांची निवड जाहीर केली.

मोहिते-पाटील व आमदार जानकर गटाने पंचायत समितीची निवडणूक राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार व शिवसेना शिंदे गट यांनी एकत्रित निवडणूक लढवली होती. यामध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आठ सदस्य, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे दोन व शिवसेना शिंदे गटाचे दोन असे बारा सदस्य निवडून आले आहेत. तर भाजपाचे सहा सदस्य निवडून आले आहेत. निवडीनंतर नवीन सभापती व उपसभापती यांचा खासदार धैर्यशील मोहिते पाटील आमदार उत्तमराव जानकर यांनी सत्कार केला. यावेळी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विष्णू नारनवर, मिलिंद सरतापे, प्रताप पाटील, मच्छिंद्र ठवरे, जीवन जानकर, माऊली पाटील, तुकाराम देशमुख यासह मोहिते-पाटील व जानकर गटाचे कार्यकर्ते उपस्थित होते. निवडीनंतर कार्यकर्त्यांनी गुलालाची मुक्त उधळण करीत जल्लोष केला .

# पंढरपूर पंचायत समितीच्या सभापतीपदी डॉ.आगावणे, उपसभापतीपदी देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१२ मार्च-**

पंढरपूर पंचायत समितीच्या सभापतीपदी भाजपाचे डॉ.शुभम आगावणे तर उपसभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे प्रमोद देशमुख यांची निवड झाली. दरम्यान आजच्या निवडीमुळे गेल्या ४० वर्षापासून पंचायत समितीवर असलेल्या परिचारकांच्या सत्तेला यंदा सुरुंग लावण्याचे आमदार अभिजीत पाटील आणि भगिरथ भालके यांनी पाहिलेले स्वप्न अखरे सत्यात न उतरता ते केवळ स्वप्नच राहिले.

पंढरपूर पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापतीपदाच्या निवडणूकीसाठी गुरुवारी (दि.१२ मार्च) पंचायत समिती कार्यालयात प्रांताधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया झाली. दरम्यान या निवडणूकीच्या निमित्ताने अनेक नाट्यमय घडामोडी घडल्याचे पहावयास मिळाले. या निवडणूकीत परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने एकमेकांना साथ देत सभापती आणि उपसभापतीपदाची निवडणूक आपल्या बाजूने केली.





**आमदार पाटील आणि भालकेंचे स्वप्न राहिले अधुरे**

४० वर्षापासून पंचायत समितीवर एकहाती सत्ता असलेल्या परिचारक गटाला या वेळेस सत्तेपासून दूर ठेवायचे असा चंग आमदार पाटील आणि भालके यांनी बांधला होता. मात्र परिचारकांनी अखेरच्या क्षणी खेळी करत सत्ता मिळवली. त्यांना पंचायत समितीच्या सत्तेपासून दूर ठेवण्याचे स्वप्न धुळीस मिळाले.

**राजकारणात कोण कुणाचा कायमचा मित्र किंवा शत्रु नसतो :** नुकत्याच झालेल्या पंचायत समिती निवडणूकीत भाजपाला ८ तर आमदार पाटील व भालके गटाला ८ जागा मिळाल्या. त्यामुळे सत्तास्थापनेवेळी काय होणार याची उत्सुकता होती. मात्र परिचारकांनी अखेरची खेळी करीत आपले जुने सहकारी (मात्र मधल्या काळापासुन परिचारकांशी काहीसे अंतर ठेवून असलेले राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख यांच्याशी संधान बांधले. देशमुखांचा पाठिंबा मिळवित कासेगाव गणातील सदस्य प्रमोद देशमुख यांना उपसभापतीपद देण्याचा निर्णय घेतला. देशमुख यांच्या पाठिंब्यामुळे आकड्याचे गणित जुळून आले. ऐनवेळी आमदार पाटील व भालके या दोघांनाही देशमुखांना गटात खेचण्यात अपयश आले. त्यामुळे राजकारणात कोण कुणाचा कायमचा शत्रु नसतो आणि मित्र नसतो हा प्रत्यय आला.

**परिचारक, गायकवाड यांनी लिलया पेलली जबाबदारी :** परिचारक गटाकडून मध्यंतरीच्या काळात काहीसे दूरावलेले वसंतराव देशमुख यांच्या बरोबर चर्चा करण्याची जबाबदारी उमेश परिचारक आणि पंढरपूर तालुका कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरिष गायकवाड यांच्यावर सोपविली होती. या दोघांनीही ही जबाबदारी लिलया पेलत अखेर वसंतराव देशमुख यांचा पाठिंबा मिळविला.

**विरोधकांकडून सभापती,उपसभापतीपदासाठी दाखल केले अर्ज**

आमदार पाटील गटाकडून सभापतीपदासाठी सावली गायकवाड यांनी तर उपसभापतीपदासाठी शहाजी मुळे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

**निवडी नंतर एकच जल्लोष :** पंचायत समिती मधील आकड्यांचे गणित पालटल्यामुळे पंढरपूर तालुका पंचायत समितीच्या सभापतीपदी परिचारकांच्या नेतृत्वाखालील भाजपाचे डॉ.शुभम आगावणे यांची तर उपसभापतीपदी वसंतराव देशमुखांचे विश्वासू शिलेदार प्रमोद देशमुख यांची वर्णी लागली. सभापती, उपसभापतींच्या निवडीनंतर परिचारक आणि देशमुख यांच्या कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. यावेळी पंचायत समितीच्या आवारात ढोल, ताशांच्या गजरात गुलालाची उधळण करण्यात आली.

**निधनानंतर देखील निभावली दोस्ती :** स्व. सुरेशराव आगावणे यांनी आपल्या हयातीत संपूर्ण वेळ पक्षासाठी देत परिचारक कुटुंबावर नितांत प्रेम करत निष्ठा जपली होती. दुर्दैवाने कोरोनामध्ये त्यांचे निधन झाले. सुरेशरावानंतरही प्रशांत परिचारकांनी त्यांचे पुत्र डॉ.शुभम यांना उमेदवारी देण्यापासून निवडून आणेपर्यंत जबाबदारी पार पडली. आता सभापती पदावरही त्यांना विराजमान करून आपले दोस्त स्व.सुरेशराव यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली वाहिल्याची भावना पांडुरंग परिवारातील कार्यकर्त्यांनी बोलून दाखविली.

# ‘दक्षिण’च्या सभापतीपदी संदीप टेळे; उपसभापतीपदी वर्षा पटणे

### बिनविरोध निवडणूक; देशमुख व कल्याणशेट्टी गट निवडीवेळी एकत्र

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १२ मार्च-**

दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती पदाची निवड गुरुवारी १२ मार्च रोजी पंचायत समितीच्या विसावा सभागृहात झाली. यावेळी सभापतीपदासाठी औराद गणाचे सदस्य संदीप टेळे तर उपसभापतीपदासाठी बोरामणी गणाच्या वर्षा पटणे यांचे प्रत्येकी एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड करण्यात आली. आमदार सुभाष देशमुख व आमदार सचिन कल्याणशेटी यांचे संदिप टेळे नावावर एकमत झाल्याने निवड बिनविरोध झाली.



यावेळी कार्यकर्त्यांनी हलगीच्या तालावर नृत्य व गुलालांची उधळण करीत जल्लोष केला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून उपजिल्हाधिकारी अंजली मरोड यांनी काम पाहीले. यावेळी दक्षिणचे तहसीलदार किरण जमदाडे व गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी सहायक म्हणून काम पाहीले. प्रारंभी आमदार सचिन कल्याणशेटी व सिध्देश्वर बाजार समितीचे संचालक मनिष देशमुख यांच्या उपस्थितीत बैठक झाली. यावेळी सभापतीपदासाठी संदिप टेळे तर उपसभापतीपदासाठी वर्षा पटणे यांच्या नावावर एकमत झाले. त्यानंतर दुपारी १२ वाजता दोन्ही उमेदवारांनी अर्ज दाखल केला. दुपारी दोन वाजता बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्य मळसिद्ध मुगळे, विजय राठोड, शिल्पा बिराजदार, अंबिका पाटील, सुरज पाटील, बलवान गोतसुर्वे, पंचप्पा धनशेट्टी, अंबिका दुपारगुडे आणि प्रियांका आसबे तसेच शिवसेनेच्या प्रियांका कुबसंगे उपस्थित होते. जिल्हा परिषद सदस्य रामप्पा चिवडशेट्टी, नेताजी खंडागळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील कळके, तालुकाध्यक्ष संगप्पा केरके, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष अप्पासाहेब मोटे, अतुल गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष महेश बिराजदार, सिद्धाराम हेले, हणमंत कुलकर्णी, जिल्हा चिटणिस यतीन शहा, औरादचे माजी सरपंच शांतकुमार गडदे, बाळासाहेब पाटील, नितीन रणखांबे, शशिकांत दुपारगुडे आदी भाजपाचे पदाधिकारी उपस्थित होते. निवडीनंतर नूतन सभापती व उपसभापतींचा सत्कार करण्यात आला.

**सर्वसमावेशक व्यक्तिमत्वामुळे टेळे यांची निवड**

संदिप टेळे यांना २०१७ च्या निवडणूकीत पंचायत समिती सदस्य म्हणून निवडून आल्यावर उपसभापती पदाची संधी मिळाली. यंदाच्या निवडणूकीतही औराद गणातून निवडून आल्यावर आमदार देशमुख व आमदार कल्याणशेट्टी दोन्ही गटाकडून त्यांच्या नावावर एकमत झाले. सर्वसमावेशक व शांत स्वभावामुळे टेळे यांना संधी मिळाल्याचे कार्यकर्त्यांमध्ये चर्चा होती.

**तालुक्याच्या विकासासाठी एकत्र**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीत आमदार देशमुख व आमदार कल्याणशेटी यांच्यामध्ये गटबाजी दिसून आली होती. मात्र निवडणूक संपल्यानंतर पक्षावाढीसाठी व तालुक्याच्या विकासासाठी दोन्ही गट एकत्र आल्याचे दिसून आले. बिनविरोध निवडीमुळे तालुक्याच्या राजकारणात एकोपा दिसून आला असून, आगामी काळात तालुक्याच्या विकासकामांना गती देणार असल्याचे नूतन पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

### सांगोला पंचायत समितीवर महायुतीची सत्ता

# सभापतीपदी भाजपच्या पुनम इंगवले, उपसभापतीपदी शिवसेनेचे अजय सरगर

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१२ मार्च -**

सांगोला पंचायत समिती सभापती व उपसभापती निवडीसाठी गुरुवार दि.१२ मार्च रोजी निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी व गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत पं.स.सदस्य यांनी हात वरती करून अशी मतदान निवडणूक प्रक्रिया पार पडली.





सर्वसाधारण महिला या आरक्षित सभापती पदासाठी भारतीय जनता पार्टीकडून जवळा पं.स.सदस्य पुनम सुदर्शन इंगवले यांनी तर शेतकरी कामगार पक्षाकडून सोनंद पं.स.सदस्य काजल मुकेश काशीद यांनी अर्ज दाखल केला. यावेळी पुनम इंगवले यांना १४ पैकी ८ तर काजल काशीद यांना ६ मते पडली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी पुनम इंगवले यांना सभापतीपदी विजयी झाल्याचे जाहीर केले. तसेच उपसभापती पदासाठी शिवसेना (शिंदे गट) यांचेकडून चोपडी पं.स.सदस्य अजय उत्तम सरगर यांनी तर शेतकरी कामगार पक्षाकडून कोळा पं.स.सदस्य छाया सोपान कोळेकर यांनी अर्ज दाखल केला. यावेळी अजय सरगर यांना १४ पैकी ८ तर छाया कोळेकर यांना ६ मते पडली. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी अजय सरगर यांना उपसभापतीपदी विजयी झाल्याचे जाहीर केले. यावेळी सहा. गटविकास अधिकारी वसंत फुले, सहा.लेखा अधिकारी आनंद जाधव, पंचायत विस्तार अधिकारी अमोल तोडकरी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संदीप देवकते, बाल विकास प्रकल्प अधिकारी अभिजीत मोलाणी, गटशिक्षणाधिकारी सुयोग नवले, पाणीपुरवठा अभियंता एस.आर.पुजारी, बांधकाम उपअभियंता अतुल लेंडवे, सहा.प्रशासन अधिकारी अजित देशमुख, कक्ष अधिकारी महेश जाधव, परमेश्वर नागने, आरोग्य विस्तार अधिकारी मिलिंद सावंत, सचिन घाडगे, विजय घेरडे, अभिजीत पवार, बाबुराव खटकाळे, निखील बाबर, समाधान वाघमोडे, अमोल देशमुख हे उपस्थित होते.

# कृषीच्या ४८४ जागांना उपसमितीची मान्यता द्या

### तालुकाध्यक्ष पाटील यांची पालकमंत्र्यांकडे मागणी

**मोडनिंब, दि.१२ मार्च-**

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या रिक्त असलेल्या ४८४ जागा वित्त विभाग उपसमितीची मान्यता घेऊन एमपीएससी कडे पाठवण्यात याव्या व मागील दोन वर्षापासून एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी भाजपाचे तालुकाध्यक्ष योगेश पाटील यांनी ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.



गेल्या दोन वर्षापासून कृषी सेवेतील पदांना वित्त विभाग उपसमितीची मान्यता न मिळाल्यामुळे कृषी अधिकारी पदाच्या जागा जाहीर झालेल्या नाहीत. त्यामुळे कृषी क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांमध्ये निराशा निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२६ अंतर्गत प्रस्तावित ४८४ जागांना वित्त विभाग उपसमितीचे मान्यता देऊन संबंधित जागा लवकरात लवकर एमपीएससीकडे पाठवण्याबाबत सकारात्मक हस्तक्षेप करावा अशी मागणी पाटील यांनी केली. यावेळी आदित्यराज गोरे हे देखील उपस्थित होते.

# अखेर माढा पंचायत समितीवर भाजपाचाच झेंडा

### पंडीत देशमुख सभापती तर स्वाती गीड्डे उपसभापतीपदी बिनविरोध; संजय कोकाटेंमुळे निवडणूक टळली

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.१२ मार्च-**

माढा पंचायत समितीच्या सभापतीसाठी नाट्यमय घडामोडीनंतर माजी आमदार शिंदे बंधूकडून भाजपाचे पंडित देशमुख तर उपसभापती म्हणून अपक्ष भाजपा पुरस्कृत स्वाती गीड्डे यांची एकमताने निवड करण्यात आली. यामुळे सन १९६२ पासुन एक अपवाद वगळता शिंदे घराण्याच्या विचारसरणीचा तर भाजपाला प्रथमच सभापतीपद मिळण्याचा बहुमान मिळाला आहे. या दोघांच्या रूपाने अखेर माढा पंचायत समितीवर भाजपाचाच झेंडा फडकला आहे. यावेळी पंचायत समिती सदस्य सोनाली साठे, नितीन झाडबूके, छायादेवी करंडे, आशिष रजपूत, अमृता पाटील, संभाजी पाटील, सुनिता पाटील, प्रतीभा खरात, बिभिषण डांगे, सोनाली माळी, प्राजक्ता पाटील उपस्थीत होते.





सकाळी अकरा वाजता सभापती व उपसभापती पदासाठी फॉर्म भरण्याच्या वेळी सभापतीपदासाठी भाजपाचे पंडीत देशमुख व राष्ट्रवादी काँग्रेस (शप) चे पोपट अनपट तर उपसभापती पदासाठी स्वाती गीड्डे व अपक्ष सोनाली साठे यांनी अर्ज भरला. १९६२ सालापासुन शिंदे बंधूंच्या विचारसरणीचे सभापती व उपसभापती बिनविरोध होण्याच्या परंपरेला यावेळेस खिळ बसेल अशा पध्दतीचे वातावरण विरोधकाकडून तयार करण्यात आले होते. मात्र माजी आमदार संजयमामा शिंदे व जि.प.चे माजी समाजकल्याण सभापती शिवाजी कांबळे यांनी विरोधकांना विकासाच्या मुद्द्यावर सहकार्य करण्याची विनंती केली. त्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे जि.प.सदस्य संजय कोकाटे यांनी सभापतीपदाचे उमेदवार पोपट अनपट व उपसभापतीपदाचे उमेदवार सोनाली मुन्ना साठे यांना सांगितल्याने त्यांनी अखेरच्या क्षणी उमेदवारी अर्ज माघारी घेतले. त्यानंतर पिठासन अधिकारी तथा प्रांताधिकारी मनिषा आव्हाड व सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा तहसिलदार संजय भोसले यांनी सभापतीपदी पंडीत देशमुख तर उपसभापतीपदी स्वाती हनूमंत गीड्डे बिनविरोध निवडून आल्याचे घोषीत केले.

बिनविरोध निवडीबाबत शिवसेनेचे नेते संजय कोकाटे यांनी सांगीतले कि, माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्याशी चांगली मैत्री आहे. आम्ही वेगवेगळ्या पक्षात असलो तरी विकासाच्या मुद्द्यावर आम्ही एकत्र आहे. विकासासाठी भाजापाच्या उमेदवारांना बिनशर्त पाठींबा देत असल्याचे सांगीतले. यावेळी जिल्हा दुध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे उपस्थित होते. बिनविरोध निवडीनंतर सभापती पंडीत देशमुख व उपसभापती स्वाती गीड्डे यांच्या कार्यकर्त्यांना ढोल-ताशाच्या गजरात गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. शेवटी सभापती व उपसभापतींनी पं.स.आवारातील कै. विठ्ठलराव शिंदे यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**दोन संजयची दिलजमाई अन् निवडणूक बिनविरोध**

निवडणूक बिनविरोध होण्यासाठी भाजपाचे तालुकाध्यक्ष योगेश पाटील व जि.प.चे माजी सभापती शिवाजी कांबळे यांनी शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जि.प.सदस्य संजय कोकाटे यांच्याशी चर्चा करत प्रयत्न केले. यावेळी मार्केट कमीटी व पं.स.मध्ये माजी आ.संजयमामा शिंदे निवडणूक बिनविरोध करण्यासाठी तळ ठोकून होते. दोघांच्या प्रयत्नातून जि.प.सदस्य संजय कोकाटे यांनी सभापती व उपसभापती पदाच्या दोन्ही उमेदवारांना अर्ज माघार घेण्यास सांगितले त्यामुळे निवडणूक बिनविरोध झाली. संजयमामा शिंदे यांनी विरोधकांनी केलेल्या सहकार्यामुळे त्यांचे आभार मानले.